Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक २] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १३-१९, २०२२/पौष २३-२९, शके १९४३ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-८ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त), केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६४.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

क्रमांक उविअ-भूसं-म.सहा.-कावि-४८८-२०२१.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आलेला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते ज्याच्या स्वरूपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीचा उक्त सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे (नियुक्त करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, राळेगांव यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १७-४७-२०१८-१९, गाव रामतीर्थ, तालुका राळेगांव, जिल्हा यवतमाळ

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित संपादित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ११३ | ० १७ |
| २ | ८७ | ० ११ |
| ३ | २०/२ | ० १२ |
| ४ | २०/३ | ० १३ |
| ५ | ५१ | ० २६ |
| ६ | ४६ | ० ०६ |
| ७ | ४७ | ० ०८ |
| ८ | ४९ | ० १८ |
| ९ | ५० | ० २२ |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | १ ३३ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :— | उंदरी-रामतीर्थ रस्त्याचे बांधकाम करणे. |
| प्रकल्प कार्यालयाचे वर्णन | :— | रस्त्याचे बांधकामाकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | या प्रकल्पाद्वारे १.३३ हे. आर जमीन संपादित होणार असून, लाभक्षेत्रातील संबंधित शेतक-यांना व इतर लोकांना वाहतुकीची सोय होईल. |

## अनुसूची-तीन

## बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही.  सबब माहिती निरंक

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजना सारांश

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) | :— | दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण-०१-२०१५ प्र.क्र.३-अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १० नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. |

## अनुसूची-पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | :— | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | :— | निरंक |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशिल | :— | निरंक |

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, राळेगांव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक १५ ऑक्टोबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६५.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

क्रमांक उविअ-भूसं-म.सहा.-कावि-५८८-२०२१.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आलेला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते ज्याच्या स्वरूपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीचा उक्त सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे (नियुक्त करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, राळेगांव यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १६-४७-२०१८-१९, गाव धर्मापुर, तालुका राळेगांव, जिल्हा यवतमाळ

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ४२/१/घ | ० २१ |
| २ | ४२/१/फ | ० ११ |
| ३ | ४४/२/अ | ० १७ |
| ४ | ३७/१/अ/१ | ० ३१ |
| ५ | ३६/२ | ० २० |
| ६ | ४४/२/ब | ० १२ |
| ७ | ४४/२/क | ० १५ |
| ८ | ४४/२/ड | ० २० |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | १ ४७ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :— | उंदरी-रामतीर्थ रस्त्याचे बांधकाम करणे. |
| प्रकल्प कार्यालयाचे वर्णन | :— | रस्त्याचे बांधकामाकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | या प्रकल्पाद्वारे १.४७ हे. आर जमीन संपादित होणार असून, लाभक्षेत्रातील संबंधित शेतक-यांना व इतर लोकांना वाहतुकीची सोय होईल. |

**अनुसूची-तीन**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजना सारांश**

| | | |
|---|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) | :— | दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण-०१-२०१५ प्र.क्र.३-अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १० नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. |

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | :– | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | :– | निरंक |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशिल | :– | निरंक |

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, राळेगांव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**अमोल येडगे,**
जिल्हाधिकारी,
यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक २२ नोव्हेंबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६६.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

शासकीय अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र. टी.एल.सी. १०७६-६३९२३-म-६, दिनांक १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ४१ वा) याच्या कलम ४, पोट-कलम (१) च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत, त्यांचा वापर करून मी, एस. रामामुर्ती, भा.प्र.से., जिल्हाधिकारी, बुलडाणा जिल्हा जी अधिसूचना काढण्याचे योजित आहे त्या अधिसूचनेचा पुढील मसुदा उक्त कलम ४, पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे तिचा परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटिस देण्यात येत आहे की, मी, उक्त मसुदा दिनांक ३१ जानेवारी २०२२ नंतर विचारात घेईन.

उक्त मसुद्यासंबंधी कोणत्याही व्यक्तींकडून ज्या कोणत्या हरकती किंवा सूचना माझ्याकडे उपरोक्त तारखेपूर्वी येतील त्या मी विचारात घेईन.

**अधिसूचनेचा मसुदा**

क्रमांक कक्ष ७-अ.का.-१-कावि-२२३०-२०२१.—

शासकीय अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र. टी.एल.सी. १०७६-६३९२३-म-६, दिनांक १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ४१ वा) याच्या कलम ४, पोट-कलम (१) च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत, त्यांचा वापर करून मी, एस. रामामुर्ती, भा.प्र.से., जिल्हाधिकारी, बुलडाणा जिल्हा, याद्वारे दिनांक ३१ जानेवारी २०२२ पासून बुलडाणा जिल्ह्याच्या खामगांव तालुक्यातील “खामगांव नगर परिषद हद्दीच्या बाहेर असलेल्या त्रिशंकु भागातील” सोबतच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या हद्दी असलेल्या व बुलडाणा जिल्ह्याच्या खामगांव तालुक्यातील “गजानन नगरी” या नावाने ओळखण्यात येणा-या महसूली गावात रुपांतर करीत आहे.

**अनुसूची**

**भूमापन क्रमांक**

मौजा गजानन नगरी, ता. खामगांव, जिल्हा बुलडाणा येथील सर्व्हे नंबर ७४, ७६, ७९, ८०, ८१, ८२, ८३ व ८४

नोट :- खामगांव येथील गुरे चराई, दहन/दफन भूमि, खळे किंवा मळई करीता निहित असलेल्या जमिनीचा त्याच प्रयोजनासाठी वापर करण्याचे हक्क गजानन नगरी येथील रहिवाश्यांना राहतील.

**एस. रामामुर्ती** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक २८ डिसेंबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६७.

BY COLLECTOR

The following draft of a Notification which I, S. Ramamurthy, I.A.S. Collector of Buldana District propose to issue in exercise of the powers of the State Government under the *proviso* to sub-section (*1*) of Section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), delegated to me by Government Notification, Revenue and Forests Department, No. TLC-1076-63923-M-6, dated 1st July 1976, is hereby published as required by sub-section (*4*) of the said Section 4 for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by me after the 31st January 2022.

2. Any objections or suggestion which may be received by me from any persons with respect to the said draft before the aforesaid date will be considered by me.

*DRAFT-NOTIFICATION*

No. Ws-Rev-Desk-7-A.K.-1-2230-2021.—

In exercise of the powers of the State Government under the proviso to sub-section (*1*) of Section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), delegated to me by Government Notification, Revenue and Forests Department, No. TLC-1076-63923-M-6, dated 1st July 1976, I, S. Ramamurthy, I.A.S. Collector, Buldana District hereby, with effect from 31st January 2022 constitute the “ Gajanan Nagari ” in the Khamgaon taluka of the Buldana District to be a village to be called as the “ Gajanan Nagari ” having the limits specified in the schedule given below.

SCHEDULE

*(Survey Numbers)*

Mauja Gajanan Nagari, Taluka Khamgaon, District Buldana Survey Numbers 74, 76, 79, 80, 81, 82, 83 and 84.

Note :- Residents of “ Gajanan Nagari ” shall have a right over the assigned lands for grazing land, cremation ground, threshing floor *etc.* of Khamgaon for the said purpose.

S. RAMAMURTHY (I.A.S.),
Collector,
Buldana.

Buldana :
Dated the 28th December 2021.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६८.

## उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांजकडून

### खाजगी क्षेत्रातील जमीन थेट वाटाघाटीद्वारे खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

क्रमांक कावि-क.लि.-समृद्धी महामार्ग-७१७-२०२१.—

ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बुलडाणा यांनी हिंदु ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३-२०१५-प्र.क्र. ३४-अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतूदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागामधील तरतूदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादित यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे आदेश क्रमांक जा.क्र. समृद्धी महामार्ग विभाग-२९५-२०२१, दिनांक १३ डिसेंबर २०२१ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र. १२-अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनूसार मी, भुषण अहिरे, उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सिंदखेडराजा याद्वारे—

(एक) अनुसूची-एकमध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादित यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे; आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलमे २६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतूदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या २५ % रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणप्रमाणे खाजगी वाटाघाटीद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीमत्रे (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनीही नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सिंदखेड राजा (महामंडळाचा प्राधिकृत अधिकारी) यांच्याकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सिंदखेड राजा (महामंडळाचा प्राधिकृत अधिकारी) यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/महामंडळाच्या प्राधिकृत अधिका-यांमार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

(४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सिंदखेड राजा यांच्या कार्यालयामध्ये व महामंडळाच्या प्राधिकृत अधिका-याच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची-एक**

**खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील**

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र./गट क्र. | संपादनाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | हे. आर |
| १ | देऊळगाव राजा | आसोला जहाँगीर | ४९० | ० २४०० |
| २ | सिंदखेड राजा | देऊळगाव कोळ | २७५ | ० २४४६ |

**भूषण अहिरे,**
उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,
सिंदखेडराजा.

सिंदखेडराजा :
दिनांक २४ डिसेंबर २०२१.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६९.

## खाजगी क्षेत्रातील जमीन थेट वाटाघाटीद्वारे खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

क्रमांक कावि-क.लि.-समृद्धी महामार्ग-७६२-२०२१.—

ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बुलडाणा यांनी नागपूर-मुंबई शघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृद्धी महामार्ग) या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३-२०१५-प्र.क्र. ३४-अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतूदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागामधील तरतूदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादित यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे आदेश क्रमांक जा.क्र. समृद्धी महामार्ग विभाग-२९४-२०२१, दिनांक २२ डिसेंबर २०२१ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र. १२-अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, गणेश राठोड, उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेहकर याद्वारे—

(एक) अनुसूची-एकमध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादित यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे; आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलमे २६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतूदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या २५ % रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणप्रमाणे खाजगी वाटाघाटीद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीमत्रे (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनीही नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेहकर (महामंडळाचा प्राधिकृत अधिकारी) यांच्याकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेहकर (महामंडळाचा प्राधिकृत अधिकारी) यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/महामंडळाच्या प्राधिकृत अधिका-यांमार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

(४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेहकर यांच्या कार्यालयामध्ये व महामंडळाच्या प्राधिकृत अधिका-यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

### अनुसूची-एक

### खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र./गट क्र. | संपादनाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | हे. आर |
| १ | मेहकर | शहापुर | ११५ | ० ०५२८ |
| २ | मेहकर | शहापुर | १० | ० ५८७२ |

**गणेश राठोड,**
उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,
मेहकर.

मेहकर :
दिनांक २७ डिसेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.